MHKO100002402014

**नियमीत दिवाणी दावा क्र. ९७/२०१४**

शिवाजी देसाई वगैरे
/वि/
यशवंत देसाई वगैरे

**निशाणी क्र. ६४ वर आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.४ कमळाबाई लक्ष्मण देसाई यांना दाव्यातून वगळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींतर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, वादी क्र.४ कमळाबाई लक्ष्मण देसाई हया मयत झालेल्या आहेत. वादींचे कथनानुसार मयत वादी क्र.४ कमळाबाई लक्ष्मण देसाई यांना इतर वादी हेच सरळ व कायदेशिर वारस असून ते दाव्यात पक्षकार म्हणून सामील आहेत. त्यामुळे, त्यांनी वादी क्र.४ कमळाबाई लक्ष्मण देसाई यांना दाव्यातून कमी करुन त्यांचे नांव वगळण्याची विनंती केलेली आहे. प्रतिवादींतर्फे केवळ अर्जातील कथन खोटे असलेबाबत म्हणणे दाखल केले. परंतु, प्रतिवादींनी वादी क्र.४ कमळाबाई लक्ष्मण देसाई यांना प्रस्तुत दाव्यातील इतर वादींव्यतिरिक्त आणखी कोण वारस आहेत याबाबत स्पष्टपणे नमुद केलेले नाही. तसेच, प्रस्तुतचा दावा हा मनाईकरीता दाखल केलेला असल्याने वादी क्र.४ कमळाबाई लक्ष्मण देसाई यांना प्रस्तुत दाव्यातून वगळल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसुन दाव्याच्या गुणदोषावर कोणताही परिणाम होणार नाही. त्यामुळे, वादी क्र.४ कमळाबाई लक्ष्मण देसाई यांचे वारस पूर्वीच अभिलेखावर पक्षकार म्हणुन सामील असल्याने त्यांचे नांव दाव्यातून कमी करणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

०२. वादी क्र.४ कमळाबाई लक्ष्मण देसाई यांचे नांव दाव्यातून वगळण्यात येते.

( खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )

सही/-

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २९/०१/२०२४.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 29/01/2024 |
| Order signed by P.O. on | 29/01/2024 |
| Order uploaded on | 29/01/2024 |